प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेच्या व्यापक प्रसिध्दी व अमंलबजावणीसाठी विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांना नोडल अधिकारी आणि सहायक कामगार आयुक्त (असंघटीत कामगार) यांना मा. मुख्यसचिव कार्यालयाच्या ई-समिक्षा पोर्टलसंबंधीची माहिती पुरविणे व अन्य बाबी इ. साठी नियुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- असंका-२०१९/प्र.क्र.२८/काम-७अ.
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २१ जून, २०१९.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाने असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षा पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१/१२/२००८ रोजी असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ पारीत केला आहे. केंद्र शासनाच्या https://labour.gov.in/pm-symया संकेतस्थळावरील विविध १२७ व्यवसाय गटांतील कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनाही निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेच्या नोंदणीचा शुभांरभ दिनांक १५/२/२०१९ पासून करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या कामगार व रोजगार मंत्रालयाने प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेच्या नोंदणीची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. केंद्र शासनाने सदर योजनेला विविध माध्यमांतून व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी देवून जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी करण्याचे लक्ष्य राज्य शासनाला दिले आहे. यादृष्टीने योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नोडल अधिकारी जाहीर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेला राज्यातविविध माध्यमांतून व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी देवून जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी करण्याकरीताव योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून भविष्यात प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांची राज्यशासन स्तरावर अंमलबजावणी करण्याकरीता तसेच केंद्र आणि राज्य स्तरावर आयोजित दूरचित्रवाणी परिषदेला (व्ही. सी.) उपस्थितराहणे इ.साठी विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांना नोडल अधिकारी व सहायक कामगार आयुक्त (असंघटीत कामगार) यांना मा. मुख्यसचिव कार्यालयाच्या ई-समिक्षा पोर्टलसंबंधीची माहिती पुरविणे व अन्य बाबी इ.साठी नियुक्ती करण्यात येत आहे.त्यांनी योजनेच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दरमहा राज्य शासनास सादर करावयाचा आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०६२११६५३३८५४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2019.06.21 16:53:56 +05'30'

(डॉ. श्रीकांत पुलकुंडवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र यांचे सचिव (पत्राने),
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६, मंत्रालयासमोर, नरीमन पॉईंट, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
९. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११.प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक, मुंबई,
१३.कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१४.विकास आयुक्त (असंघटीत कामगार), कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
१५.बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१६.सर्व सह/उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७.सर्व सह कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१८. सर्व कामगार उप आयुक्त, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
१९.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२०.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२१.सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२.निवड नस्ती/कार्यासन-७अ.